# सातारा जिल्हा परिषद सातारा,

**सामान्य प्रशासन विभाग**

**कार्यालयाचा पत्ता** -: जिल्हा परिषद मुख्य इमारत,4 था मजला सदरबझार,सातारा कोरेगाव रोड,कॅम्प -सातारा.जि.ता. 415 001.

**कार्यालय दुरध्वनी** -: 02162295053 **Email-:** dyceogadstr@gmail.com


जा.क्र.साप्रवि/आस्था1(5)/अकंपा/39/21

दिनांक : 08/03/2021

प्रति,

1. खाते प्रमुख ------------------------------- सर्व
2. गट विकास अधिकारी, सर्व
3. कार्यालय प्रमुख ------------------------ सर्व
4. समक्ष प्रतिक्षायादीतील सर्व संबंधीत अनुकंपा धारक

विषय :- अनुकंपा तत्वावर भरतीबाबत माहे जानेवारी 2021 अखेर तात्पुरती जेष्ठता यादितील आक्षेप, हरकती घेण्याबाबत.

संदर्भ :- महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र.अकंपा-1219/प्र.क्र.56/आठ, दि.11 सप्टेंबर, 2019

वरील विषयास अनुसरून कळविणेत येते की, सातारा जिल्हा परिषदेकडील अनुकंपा भरतीच्या अनुषंगाने दिनांक 22/02/2021 रोजी सातारा जिल्हा परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर तात्पुर्ती जेष्टता यादी जाहीर केलेल्या दिनांकानंतर मा.मुख्य् कार्यकारी अधिकारी, जि.प. सातारा यांचे सुचनेनुसार दिनांक 16/03/2021 पर्यंत हरकती आक्षेप घेण्याबाबत सुचविलेले आहे.

तरी कुटूंबातील एका पात्र वारसास अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्याबाबत संबंधीत वारसाने या कार्यालयाकडे प्रस्ताव पुर्ण / अपुर्ण प्रस्ताव सादर केलेले आहेत. त्यामूळे अनुकंपा उमेदवाराने प्रस्ताव सादर करतेवेळी सादर केलेल्या कागदपत्रान्वये त्याच्या वैयक्तिक माहितीमध्ये असणा-या बदल, दुरूस्त्या तसेच हरकती, आक्षेप असल्यास सामान्य प्रशासन विभागाकडे प्रत्यक्षात दिनांक 16/03/2021 पर्यंत समक्ष किंवा dyceogadstr@gmail.com या ई-मेल वर सादर करण्याबाबतचे अवाहन करण्यात येत आहे. म्हणजे पुढील अंतिम जेष्ठता प्रतिक्षासूची तयार करण्यास सुलभ होईल.

वरील विषयाच्या अनुषंगाने हरकती व आक्षेप घेण्याबाबत या कार्यालयाकडे दिनांक 16/03/2021 ही अंतिम मुदत राहिल. अनुकंपा उमेदवाराने प्रत्यक्षात नोंद घेणे आवश्यक आहे. तदनंतर हरकती, आक्षेपाबाबत पुर्नविचार अगर कोणतीही दखल घेतली जाणार नाही याची योग्य ती नोंद घ्यावी.

( मनोज जाधव )

**उप मुख्य कार्यकारी अधिकारी(साप्र)**

**सातारा जिल्हा परिषद, सातारा**